# पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

डॉ. एस. डी. चव्हाण
विभाग प्रमुख

दूरध्वनी क्र. ०७२४-२२५६००१
ई-मेल : hdahdspdkv@gmail.com

जा.क्र./विप्र/पसंदुशा/वाहतूक/दरपत्रक/**५७४**/२०२४ दिनांक : ११/१०/२०२४

**<u>निविदा सुचना</u>**

प्रति,

______________________________

______________________________

**विषय:** विद्यापिठाच्या विविध प्रक्षेत्रावरील वाळलेला चारा मजूरीसहित ट्रक/ट्रक्टर ट्रोलीने पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला येथे वाहतुक करून आणून देण्याकरिता वाहतुकीच्या दराचे दरपत्रक बंद पाकीटात मागविणेबाबत ... ...

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे सन २०२४-२५ मधील विद्यापीठाच्या विविध प्रक्षेत्रावरील खरीप व रब्बी हंगामातील वाळलेला चारा (कडबा, कुट्टी, कुटार ई.) ट्रक/ट्रक्टर ट्रोलीने मजूरीसहित वाहतुक करून आणून देण्याकरिता खालील शर्ती व अटिंच्या अधीन राहून वाहतुक दर मागविन्यात येत असून सविस्तर वाहतुकीचे दर भरणेकरीता दरपत्रक सोबत जोडले आहे.

१. वाहतुकीचे दर हे सोबत जोडलेल्या दरपत्रकामधे भरून दरपत्रक सादर करावे.
२. वाहतुकीचे दर पुरविनेबाबतचे दरपत्रक हे **विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** यांचे नावे सादर करावे व लिफाफ्यावर '**वाळलेला चारा वाहतुकीचे दर पुरविनेबाबतचे दरपत्रक**' असा स्पष्ट उल्लेख करावा.
३. विहित नमुन्यातील दरपत्रक कार्यालयीन वेळत स. १०.३० ते सा. ५.३० वाजेपर्यंत बंद पाकीटातच स्वीकारण्यात येतील.
४. दरपत्रक सादर करण्याची अंतिम तारीख **दि. २१.१०.२०२४** असून त्याच दिवशी सा. ५.४५ वाजता मा. विभाग प्रमुख यांच्या कार्यालयात मंजूर समितीसमक्ष निविदा उघडण्यात येतील.
५. नमूद केलेले वाहतुकीचे दर हे दरपत्रक मंजूर झाल्यापासून पुढील सात महिन्याच्या कालावधीकरीता ग्राह्य राहतील.
६. वाहतुकीचे दर हे मजूरीसहित नमूद करावे. विद्यापिठाच्या विविध प्रक्षेत्रावर उपलब्ध असलेला विविध प्रकारचा वाळलेला चारा (ज्वार कडबा, सोयाबीन कुटार, हरभरा कुटार, गव्हांडा, तूर कुटार, ई. वाळलेला चारा) वाहनामध्ये भरणे व वाहतुक करून पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे नेमून दिलेल्या जागेवर आणून खाली करणे ई. करीता लागणा-या मजुरांची व्यवस्था वाहतुकदारास करावी लागेल.
७. दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या दराने मागणी केलेल्या कामाची पोहोच पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे आणून देने बंधनकारक राहील. वाहतुक समाधानकारक न झाल्यास तसेच अपेक्षेप्रमाने माल प्राप्त न झाल्यास आपले दरपत्रक तात्काळ रद्द करण्याचे अधिकार विभाग प्रमुखास राहतील.
८. वाहतुकधारकाजवळ वाळलेला चारा वाहतुक करतांना लागणारा परवाना, विमा व वाहतुक गाडीचे कागदपत्रे अद्ययावत असावीत. वाहतूकीदरम्यान गाडीची तपासणी झाल्यास कागदपत्रे अद्ययावत नसल्यास लागणारा दंड वाहतुकधारास भरावा लागेल.
९. वाहतूकीदरम्यान वाहनाच्या होणा-या नुकसानीस कोणत्याच प्रकारची जबाबदारी कार्यालयाची राहणार नाही. वाहनावर काम करणा-या मजुरांची जबाबदारी सर्वस्वी वाहतुकदाराची राहिल. वाहनामध्ये वाळलेला चारा भरतांना, खाली करतांना तसेच वाहतुकीदरम्यान मजुरांना कोणत्याही प्रकारची इजा झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वाहनधारकाची राहील.
१०. वाहतुक करून आणलेल्या मालाची शहानिशा करुन व कार्यालयीन प्रकियेनंतरच देयके काढण्यात येतील.
११. दरपत्रक विहित नमुन्यात नसल्यास दरपत्रक नामंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना राहतील.
१२. दरपत्रकाबाबतच्या अधिक माहितीकरीता विभाग प्रमुख, पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

विभाग प्रमुख
पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# <u>दरपत्रक</u>

**(FORM OF QUOTATION)**

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला येथे सन २०२४-२५ मध्ये विद्यापीठाच्या विविध प्रक्षेत्रावरील विभागातुन ' **वाळलेला चारा (कडबा, कुट्टी, कुटार, ई.) वाहतुक करून आणून देण्याकरीता वाहतुक दर पुरविण्याबाबत** ' चे दरपत्रक

| अ. क्र. | विवरण | दर प्रति ट्रिप (रुपये) | दर प्रति ट्रिप (रुपये) | दर प्रति ट्रिप (रुपये) |
|---|---|---|---|---|
| | | ट्रक | मिनी ट्रक | ट्रक्टर ट्रोली |
| १ | विभागापासुन १० किलोमीटर अंतर व पुन्हा विभागापर्यंत (मजूरीसहित) लोकल ट्रिप मुख्यालयावरील प्रक्षेत्राकरीता (म.सं.के., डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला व इतर) | | | |
| २ | विभागापासून २५ किलोमीटर अंतर व पुन्हा विभागापर्यंत (मजूरीसहित) (म.प्रा.प्र., वणीरंभापूर व इतर) | | | |
| ३ | विभागापासून १०० किलोमीटर अंतर व पुन्हा विभागापर्यंत (मजूरीसहित) (अमरावती, बुलढाणा, अचलपूर व इतर) | | | |

दरपत्रकामधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक :

सही व शिक्का